# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 10 March 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १० मार्च २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- पायाभूत सुविधा आणि कृषी क्षेत्रावर भर देणारा सुमारे ४५ हजार कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प सादर
- बळीराजा शेत आणि पाणंद रस्ते योजनेची घोषणा तर रोजगारासाठी नवी मुंबईत नाविन्यता नगर उभारण्यात येणार
- निवडणूक घोषणापत्रातली आश्वासनं अर्थसंकल्पात पाळली नसल्याची विरोधकांची टीका

आणि

- विधान परिषदेच्या पाच रिक्त जागांच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी

****

राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा सुमारे ४५ हजार ८९१ कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प आज सादर झाला. विधानसभेत अर्थमंत्री अजित पवार यांनी तर विधान परिषदेत अर्थराज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी अर्थसंकल्पाचं सादरीकरण केलं. आगामी आर्थिक वर्षात महसुली जमा पाच लाख ६० हजार ९६४ कोटी रुपये तर महसुली खर्च सहा लाख सहा हजार ८५५ कोटी रुपये अंदाजित असल्याचं, या अर्थसंकल्पात म्हटलं आहे.

राजकोषीय उत्तरदायित्व तसंच वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरल्याचं, अर्थमंत्र्यांनी म्हटलं आहे.

या अर्थसंकल्पात सार्वजनिक बांधकाम विभागाला सुमारे २१ हजार कोटी, नगर विकास १० हजार ६२९ कोटी, ग्रामविकास ११ हजार ४८० कोटी, कृषी नऊ हजार ७१० कोटी, ऊर्जा २१ हजार ५३४ कोटी, मृद आणि जलसंधारण चार हजार २४७ कोटी, जलसंपदा आणि खारभूमी विभागाला सुमारे साडे १६ हजार कोटी, जलजीवन मिशन तीन हजार ९३९ कोटी, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाला सुमारे साडे २५ हजार कोटी, पाणीपुरवठा आणि स्वच्छता तीन हजार ८७५ कोटी रुपये, सार्वजनिक आरोग्य तीन हजार ८२७ कोटी, वैद्यकीय शिक्षण सुमारे अडीच हजार कोटी, शालेय शिक्षण तीन हजार ४९६ कोटी, उच्च आणि तंत्रशिक्षण विभागास तीन हजार कोटी, तर मराठी भाषा विभागाला २२५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

नार-पार-गिरणा नदीजोड, तापी महापुनर्भरण, दमणगंगा -एकदरे -गोदावरी, आदी नदीजोड प्रकल्पांचा अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला.

**बाईट – अर्थमंत्री अजित पवार**

शेतमालाच्या वाहतूकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या शेत आणि पाणंद रस्त्यांच्या बांधणीसाठी “बळीराजा शेत आणि पाणंद रस्ते” ही नवी योजना सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली.

२७ जिल्ह्यांमध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात दोन हजार ७७९ विद्युत उपकेंद्रांसाठी सौर प्रकल्प हाती घेण्यात आले असून ते ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण होतील, असा विश्वास अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला. राज्यात वीजेचे दर कमी होणार असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं, ते म्हणाले –

**बाईट – अर्थमंत्री अजित पवार**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाचा इगतपुरी ते आमणे हा टप्पा लवकरच वाहतुकीसाठी खुला होईल. या महामार्गालगत ॲग्रो-लॉजिस्टिक हब विकसित केले जाणार असून याचा विदर्भ तसंच मराठवाड्यातील शेतकऱ्यांना लाभ होईल.

२०४७ पर्यंतचा राज्याचा दीर्घकालीन आणि सर्वसमावेशक अमृतकाल राज्य रस्ते विकास आराखडा प्रस्तावित असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना तसंच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेसह विविध योजनांच्या माध्यमातून राज्यात रस्त्यांच्या ८३ हजार कोटी रुपयांहून अधिक कामांचा अर्थमंत्र्यांनी उल्लेख केला.

“दुर्गम ते सुगम” कार्यक्रमाद्वारे डोंगराळ भागातील ४५ पर्यटन स्थळं रोप–वेद्वारे जोडण्यात येणार असून, प्राचीन मंदिरांचे जतन, संवर्धन आणि परिसर विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचं पवार यांनी सांगितलं.

छत्रपती शिवाजी महाराज मुघलांच्या नजरकैदेत असलेल्या आग्र्याच्या किल्ल्यात त्यांचं भव्य स्मारक उभारण्यात येणार असून त्यासाठी उत्तर प्रदेश शासनाच्या सहकार्याने जागा उपलब्ध करुन घेण्यात येणार असल्याचं सांगितलं. संगमेश्वर इथं छत्रपती संभाजीमहाराजांच्या स्मारक उभारणीची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली.

**बाईट – अर्थमंत्री अजित पवार**

नवीन पिढीला रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी नवी मुंबई इथं अडीचशे एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर, इनोव्हेशन सिटी, उभारण्यात येणार असल्याची माहिती अर्थमंत्र्यांनी दिली.

“एक तालुका – एक बाजार समिती” योजना, “सर्वांसाठी घरे” हे उद्दीष्ट येत्या पाच वर्षात साध्य करण्यासाठी नवीन गृहनिर्माण धोरण, सप्लाय चेन – ब्लॉक चेन तंत्रज्ञान वापरुन स्वस्त धान्याची वाहतूक तसंच वितरण प्रणाली अधिक पारदर्शक करणं, सुमारे पावणे दोन कोटी असंघटीत कामगार आणि शेतमजूरांसाठी सामाजिक सुरक्षा योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण” योजनेसाठी एकूण ३६ हजार कोटी रुपये तरतूद, राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांच्या अनुदानात २५ लाख रुपये वाढ करुन ते एक कोटी रुपये करण्यात येणार, आदी घोषणा अर्थमंत्र्यांनी केल्या.

शेतीसाठी “कृत्रिम बुध्दिमत्ता” तंत्रज्ञानाचा वापर, ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी, सर्व नगरपालिका क्षेत्रांतील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उद्योग आणि शेतीसाठी वापर, नवी मुंबईत महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची स्थापना करणार असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. प्रत्येक विषयानुरुप कवितांच्या ओळींची गुंफण हे या अर्थसंकल्पाचं वैशिष्ट्यं ठरलं.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा लोकाभिमुख अर्थसंकल्प असल्याचं म्हटलं आहे, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा अर्थसंकल्प राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

****

महायुतीने निवडणूक घोषणापत्रात दिलेली आश्वासनं अर्थसंकल्पात पाळली नसल्याची टीका विरोधकांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीया अर्थसंकल्पात सर्वसामान्य, गरीब, मध्यमवर्गीयांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले यांच्यासह माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या प्रतिक्रियेत हा अर्थसंकल्प आभासी असल्याची टीका केली.

**बाईट – जयंत पाटील, विजय वडेट्टीवार आणि उद्धव ठाकरे**

****

केंद्रीय निवडणूक आयोगानं आज विधान परिषदेच्या पाच जागांच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी केली. निवडणुकांसाठी १७ मार्च पर्यंत अर्ज दाखल करता येतील, आणि २० मार्चपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आवश्यकतेनुसार २७ मार्च रोजी मतदान होईल आणि त्याच दिवशी मतमोजणी होईल.

****